www.unishivaji.ac.in/mediaspectrum

'A'' Accredited by NAAC (2021) with CGPA 3.52

मीडिया स्पेक्ट्रम

एम. ए. मास कम्युनिकेशन विभाग प्रायोगिक प्रकाशन

कोल्हापूर | शुक्रवार : दि. ०७ जानेवारी, २०२२ | ▪ पाने ४ | ▪ खासगी वितरणासाठी

मराठी पत्रकारितेला क्रांतिकारी वारसा : प्रा. डॉ. संजीव भानावत

''पत्रकारितेतील नवे आयाम'' या विषयावर सहा विद्यापीठांतर्फे ऑनलाईन व्याख्यान संपन्न

कोल्हापूर : देशाच्या बहुभाषिक पत्रकारितेत मराठी पत्रकारितेला क्रांतिकारी वारसा आहे, बाबूराव पराडकर, बाळशास्त्री जांभेकर यांच्यासारख्या मराठी पत्रकारांची या क्षेत्रात इतिहास निर्माण केला. पत्रकारिता हे व्रत असून त्याद्वारे समाज बदलाची प्रक्रिया घडून येते, ही प्रक्रिया ताकदीने पडण्यासाठी नवपत्रकारांनी बहुविध माध्यम कौशल्ये आत्मसात करावीत असे आवाहन राजस्थान जयपूर विद्यापीठाच्या जनसंचार केंद्राचे माजी विभागप्रमुख प्रा. डॉ. संजीव भानावत यांनी केले.

मराठी पत्रकार दिनानिमित ''पत्रकारितेतील नवे आयाम'' या विषयावर आयोजित ऑनलाईन व्याख्यानात ते बोलत होते. कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव, पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ नागपूर, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर या

आभासी माध्यमातून प्रमुख पाहुण्यांसह सहा विद्यापीठांतून सहभागी मान्यवर.

विद्यापीठातील पत्रकारिता विभागांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे ऑनलाईन आयोजन करण्यात आले होते. डॉ. भानावत यांच्यासह महाराष्ट्राच्या राज्यपालांचे जनसंपर्क अधिकारी उमेश काशीकर, 'साम'चे संपादक राजेंद्र हुंजे हे यावेळी व्याख्याते म्हणून उपस्थित होते. कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगावचे प्र-कुलगुरु डॉ. बी. व्ही. पवार कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. सहभागी विद्यापीठातील जनसंवाद आणि पत्रकारिता विभागाचे प्रमुख डॉ. सुधीर भटकर (जळगाव), डॉ. रवींद्र बिंचोलकर (सोलापूर), डॉ. निशा पवार (कोल्हापूर), डॉ. उज्ज्वला बर्वे (पुणे), डॉ. मोईज हक (नागपूर), डॉ. दिनकर माने (औरंगाबाद) या वेळी उपस्थित होते.

यावेळी बोलताना डॉ. भानावत म्हणाले, ''प्रत्येक बदल हा जशी नवी आल्हाने प्रेम करतो तसेच त्यातून नव्या संधी तयार होत असतात. कोरोना काळाने हे स्पष्टपणे सिद्ध केले आहे, वृत्तपत्रे व इतर सर्वच माध्यमांनी या दरम्यानच्या काळात वेगाने बदल स्वीकारले. पत्रकारिता ही केवळ माहिती पोहोचविण्यापुरती मर्यादित न ठेवता, क्रांतिकारी पत्रकारितेचा वारसा विचारात घेत नवपत्रकारांनी नव्या समस्यांवर काम करावला हवे. पत्रकारितेच्या क्षेत्रात नव्याने येणाऱ्या विद्यार्थ्यांनी आरोग्यविषयक पत्रकारिता, डेटा जर्नालिझम सारख्या नव्या संधींचा विचार करणे ही काळाची गरज आहे. ओटीटी, व्हिडिओ आणि डिमांड, आर्टिफिशल इंटेलिजन्सचे तंत्रही त्यांना अभ्यासावे लागेल.

राज्यपालांचे जनसंपर्क अधिकारी उमेश काशीकर म्हणाले की, जनसंपर्क हा विषय खूप व्यापक आहे, जनसंपर्कातून समाजासोबत संवादाचा सेतू बांधला जातो. जनसंपर्क ही दुहेरी संज्ञापन प्रक्रिया आहे. शासकीय संस्था, लोकप्रतिनिधी, सामाजिक संस्था, कंपन्यांनी आपला संवाद अधिक दृढ करण्यासाठी जनसंपर्क केलाच पाहिजे. माध्यमक्रांती ही जनसंपर्कासाठी मोठी पर्वणी आहे. त्यामुळे माध्यमांसोबतच जनसंपर्क क्षेत्रातही करिअरच्या खूप संधी निर्माण होत आहेत. विद्यार्थ्यांनी त्याचाही विचार करायला हवा.

'साम'चे संपादक राजेंद्र हुंजे म्हणाले की, पत्रकारिता हे बदलणाऱ्या गोष्टींचेच केंद्र आहे. माध्यमात सतत बदल स्वीकारले जातात. दूरचिवाणी पत्रकारिते आशय व सादरीकरणाला खूप महत्त्व आहे. कौशल्ययुक्त पत्रकारिता ही सध्याच्या काळाची गरज आहे. पत्रकारिता ही सतत नवे शोधण्यात पुढे गेली पाहिजे. पत्रकारिता ही कमी शब्दात अधिक आशय व्यक्त करणारी, चिंतन करावला लावणारी हवी, असेही त्यांनी सांगितले.

अध्यक्षीय मनोगतामध्ये डॉ. बी. व्ही. पवार म्हणाले की, पत्रकारितेचे विश्व विस्तारात आहे. मुद्रित आणि इलेक्ट्रॉनिक माध्यमांच्या पुढे जाऊन डिजिटल माध्यमांद्वारे गतिमान पत्रकारिता केली जात आहे. नव्याने पत्रकारिते येणाऱ्या पत्रकारांनी लोकांची माहितीची गरज ओळखत, जनमत निर्माण करणारी पत्रकारिता करावी, असे आवाहनही त्यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या पत्रकारिता विभागाच्या प्रमुख प्रा. डॉ. निशा पवार यांनी प्रास्ताविक केले. डॉ. सोमनाथ बडेरे (जळगाव), डॉ. भास्कर भोसले (औरंगाबाद), अर्पण पठाणे (नागपूर), निशिगंधा श्रीरसागर (पुणे) यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. प्रा. रेजविन्नी कांबळे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. विनोद निताळे यांनी आभार मानले. कार्यक्रमासाठी डॉ. गोपी सोरडे, डॉ. सिमाभव बडेरे यांचे तांत्रिक सहकार्य लाभले.

५८ व्या दीक्षांत समारंभासाठी विद्यापीठ सज्ज

कोल्हापूर (प्रथमेश पाटील) : कोरोनाचा प्रादुर्भाव वाढत असल्यामुळे विद्यार्थी आणि शिक्षकांच्या आरोग्याच्या दृष्टीने विद्यापीठ आणि महाविद्यालये १५ फेब्रुवारीपर्यंत बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री उदय सामंत यांनी सांगितले. यामुळे शिवाजी विद्यापीठाने दीक्षांत समारंभाची ऑनलाईन आणि ऑफलाईन अशा दोन्ही प्रकारे तयारी केली आहे.

कोरोना साथीपूर्वी विद्यार्थ्यांना दीक्षांत समारंभाचे अर्ज जमा करण्यासाठी विद्यापीठात उपस्थित राहावे लागत होते; पण विद्यापीठाने कोरोना साथीपासून दीक्षांत समारंभासाठी फक्त ऑनलाइन फॉर्म भरण्याची सुविधा उपलब्ध केली आहे. त्यामुळे कोणत्याही विद्यार्थ्याला प्रत्यक्षात विद्यापीठात यावे लागत नाही. यापूर्वी, विद्यार्थ्यांचे पदवीचे प्रशस्तीपत्रक घेण्यासाठी विद्यापीठात विशेष समारंभ आयोजित केला जात होता. या कार्यक्रमांचे महाविद्यालय स्तरावर आयोजन केले जात होते; पण आता अशा समारंभाचे आयोजन करणे शक्य नाही. यामुळे मागील वर्षापासून शिवाजी विद्यापीठ सर्व पदवीधरक विद्यार्थ्यांना पदवी प्रशस्तीपत्र टपालाद्वारे पोहोच करत आहे.

५७ व्या दीक्षांत समारंभाची वैशिष्ट्ये

- कोरोनाच्या पार्श्वभूमीवर हा समारंभ साध्या आणि ऑनलाइन पद्धतीने पार पडला.
- विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहातून या समारंभाचे थेट प्रक्षेपण करण्यात आले होते. - कोरोनाबाबतच्या निर्बंधामुळे कोणतीही पदवी या समारंभामध्ये प्रदान करण्यात आली नाही.
- प्रातिनिधिक स्वरूपात राष्ट्रपती सुवर्णपदक विजेता सौरभ पाटील, कुलपती सुवर्णपदक विजेती महेश्वरी गोळे आणि पीएच.डी. धारक बसवराज माळी, अमोल माने, मृणालिनी अहिरे, बलगोंडा पाटील यांची नावे जाहीर करण्यात आली.
- कार्यक्रम विद्यापीठाच्या 'शिव-वार्ता' या यूट्यूब वाहिनीवरून थेट प्रक्षेपित करण्यात आला.
- हा समारंभ ६ हजार ९०६ नागरिकांनी लाइव्ह पाहिला.
- एकूण ७७ हजार ५२१ विद्यार्थ्यांना पदवी देण्यात आली. यातील ४० हजार १३२ विद्यार्थिनी होत्या.

विद्यापीठ कायदा बदलून दोषी आढळणाऱ्या कुलगुरूंना पदावरून हटवण्याची तरतूद त्यामध्ये करण्यात आली. याची दखल राज्य शासनाने घेऊन अधिवेशन रितसर कायद्यात तरतूद करण्याचा निर्णय घेतला. व्ही. आर. पाटील आणि बाबा सावंत यांनी केलेल्या आंदोलनामुळे सेल्फ सपोर्टिंग (प्रेस विभाग) विभागातील कर्मचाऱ्यांना पेन्शन योजना लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यामुळे कर्मचाऱ्यांच्या कुटुंबीयांना न्याय मिळाला. त्यांच्या संयमी नेतृत्वामुळे विद्यापीठात आपली वेगळी ओळख निर्माण झाली होती. विद्यापीठ कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोग लागू व्हावा, यासाठी ते नेहमी प्रयत्नशील होते. कर्मचाऱ्यांच्या विविध प्रश्नांवर आंदोलने करून त्यांनी त्यांना न्याय मिळवून दिला. सर्वांना बरोबर घेऊन विद्यापीठाची प्रतिष्ठा कोठेही कमी होणार नाही, याची दक्षता घेत त्यांनी संघटनेचा कार्यविस्तार केला. विद्यापीठातून ते २००० साली सेवानिवृत्त झाले. त्यानंतरही संघटनेच्या कार्यात ते नेहमीच अग्रेसर असायचे. बाबा सावंत विद्यापीठात सेवक संघ नावाने तयार झालेली वादळांची आणि संघटित अशी शक्ती होते. त्यांच्या जाण्याने शिक्षण क्षेत्राची मोठी हानी झाली आहे.

बाबा सावंत यांचे निधन

बाबा सावंत

कोल्हापूर (पवन पाटील): शिवाजी विद्यापीठातील सर्वसामान्य कर्मचाऱ्यांच्या अनेक प्रश्नांना न्याय मिळवून देणारे आणि कर्मचाऱ्यांच्या हक्कासाठी सदैव लढा देणारे शिवाजी विद्यापीठ कर्मचारी संघाचे अध्यक्ष बाबा सावंत यांचे ७ नोव्हेंबर, २०२१ रोजी हृदय विकाराच्या धक्क्याने निधन झाले. त्यांनी कर्मचारी वर्गासाठी दिलेले योगदान अत्यंत मोलाचे आहे, कर्मचाऱ्यांचे प्रश्न शासन दरबारी प्रभावीपणे मांडून त्यांची सोडवणूक करण्यामध्ये त्यांचा मोठा वाटा आहे.

बाबा सावंत हे मूळचे करूळ (ता. गगनबावडा) येथील होते. त्यांचे आई-वडील दोघेही स्वातंत्र्य सैनिक होते. वडील आत्माराम सावंत हे स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्यानंतरच्या विधीमंडळाला सदस्य होते. शिवाजी विद्यापीठाच्या स्थापनेपासूनच ते कार्यरत होते. विद्यापीठ सेवक संघाचे संस्थापक व्ही.आर.पाटील यांच्याबरोबर बाबा सावंत यांनी विद्यापीठाच्या उभारणीत योगदान दिले. ते सेवक संघाचे १९९८ पासून अध्यक्ष म्हणून कार्यरत होते. महाराष्ट्र विद्यापीठ कर्मचारी महासंघाच्या संस्थापक सदस्य होते. मनोयुवा ज्येष्ठ नागरिक संघटनेचे अध्यक्ष म्हणूनही ते कार्यरत होते.

बाबा सावंत यांनी विद्यापीठ कर्मचाऱ्यांच्या अनेक प्रश्नांना न्याय मिळवून देण्याचे काम केले. त्यांच्या आंदोलनामुळे